# अर्थशास्त्र
# बी.ए. प्रथम वर्ष (सेमिस्टर II)
# (डॉ. प्रज्ञा बागडे)

## प्राप्तीचे विश्लेषण
## (Revenue Analysis)

पेढीच्या खर्चाचे विश्लेषण जेवढे महत्वपूर्ण आहे तेवढेच पेढीच्या प्राप्तीचे विश्लेषण ही महत्वपूर्ण आहे. प्राप्ती म्हणजे विशिष्ट किंमतीला विशिष्ट परिमाण विकून मिळविलेले उत्पन्न असते. अधिकाधिक नफा मिळविणे हे प्रत्येक उत्पादकाचे उद्दिष्ट असते. उत्पादकाला मिळणारा नफा हा त्याला वस्तूच्या विक्रयापासून मिळणारी प्राप्ती व वस्तूच्या उत्पादनाकरीता येणारा खर्च यातील अंतरावर अवलंबून असते. हे अंतर जेवढे जास्त असेल तेवढा उत्पादकाला मिळणारा नफा जास्त राहील. प्राप्ती ही एकूण, सरासरी व सीमांत अशा तीन प्रकारात व्यक्त केली जाते.

**एकूण प्राप्ती**

**(Total Revenue)**

"पेढीचे एकूण उत्पादन प्रचलीत किंमतीला विकून प्राप्त होणारे एकूण उत्पन्न म्हणजे पेढीची एकूण प्राप्ती होय."

उदा. १० नग प्रत्येकी १० रु. किंमतीला विकले तर १० नग x १० रु. =१०० रु. ही एकूण प्राप्ती होय.

**सरासरी प्राप्ती**

**(Avarage Revenue)**

"एकूण प्राप्तीला विकलेल्या एकूण नगसंख्येने भाग दिल्यानंतर मिळणारी प्राप्ती सरासरी प्राप्ती होय."

सूत्ररुपाने

$$\text{सरासरी प्राप्ती} = \frac{\text{एकूण प्राप्ती}}{\text{एकूण नगसंख्या}}$$

उदा. समजा, एकूण प्राप्ती १०० रु. असून विकलेली एकूण नगसंख्या १० नग आहे तर

$$\text{सरासरी प्राप्ती} = \frac{\text{१०० रु.}}{\text{१० नग}}$$

$$= \text{१० रु.}$$

**सीमांत प्राप्ती**

**(Marginal Revenue)**

"वस्तूच्या विक्री परिमाणात एका नगाने वाढ केली असता एकूण प्राप्तीत पडणारी शुद्ध भर म्हणजे सीमांत प्राप्ती होय."

दुसऱ्या शब्दात, उद्योगसंस्थेला तिच्या उत्पादनाच्या शेवटच्या नगाची विक्री झाली असता तिच्या एकूण प्राप्तीत जी भर पडते तिला सीमांत प्राप्ती असे म्हणतात.

उदा. समजा, उत्पादकाने १० नगांची विक्री केल्यास ५०० रुपयांची प्राप्ती होते. ११ वा नग विकल्यास उत्पादकाला ५५० रुपयांची प्राप्ती होते. म्हणजेच एक जास्तीचा नग विकल्यास एकूण प्राप्तीमध्ये ५० रुपयांची भर पडल्याने ११ व्या नगाची सीमांत प्राप्ती ५५० - ५०० = ५० रुपये आहे.


## पूर्ण स्पर्धेत सरासरी व सीमांत प्राप्ती वक्र

पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत एक पेढी प्रचलीत किंमतीला उत्पादीत माल विकत असल्यामुळे सर्वत्र वस्तूची किंमत सारखी असते. याच किंमतीला उत्पादकांना आपले

उत्पादन विकावे लागते. पूर्ण स्पर्धेत वस्तूची एकच किंमत असण्याचे कारण की पूर्ण स्पर्धेत विक्रेत्याची संख्या जास्त असते. एका उत्पादकाने केलेला पुरवठा बाजारातील एकूण पुरवठ्याच्या तुलनेत नगण्य असतो. त्यामुळे बाजारातील एकूण पुरवठ्यावर परिणाम होत नाही. तसेच पूर्ण स्पर्धेत ग्राहकांची संख्या ही फार मोठी असते. एका ग्राहकाने मागणी कमी किंवा जास्त केल्यास बाजारातील एकूण मागणीवर परिणाम होत नाही. म्हणून पूर्ण स्पर्धेत उत्पादकाची सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती समान असते. वस्तूची किंमत हीच सरासरी व सीमांत प्राप्ती असल्यामुळे किंमत दर्शक वक्र परिपूर्ण लवचिक मागणी वक्र असून तोच सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती वक्र देखील आहे.

| **किंमत (रु.)** | **विक्री झालेली नगसंख्या** | **एकूण प्राप्ती (रु.)** | **सरासरी प्राप्ती (रु.)** | **सीमांत प्राप्ती (रु.)** |
|---|---|---|---|---|
| १० | १ | १० | १० | १० |
| १० | २ | २० | १० | १० |
| १० | ३ | ३० | १० | १० |
| १० | ४ | ४० | १० | १० |
| १० | ५ | ५० | १० | १० |

वरील कोष्टकात १० रु. ही पूर्ण स्पर्धेतील एकमेव व स्थिर किंमत आहे. किंमत व सरासरी प्राप्ती समान असल्याने सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती सुद्धा समान आहे.





आकृतीमध्ये क क वक्र अ क्ष अक्षाला समांतर आहे. किंमत अ क स्थिर आहे. म्हणून किंमत, सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती समान आहे.

## एकाधिकारात सरासरी व सीमांत प्राप्ती वक्र

एकाधिकारात पुरवठ्यावर व किंमतीवर एकाधिकाऱ्याचे पूर्ण नियंत्रण असते. तो किंमतीत वाढ किंवा घट करु शकतो. ही बाजारातील विशिष्ट प्रकारची परिस्थिती पूर्ण स्पर्धायुक्त बाजारपेठेपेक्षा अगदी वेगळी असते. बाजारपेठेत एकच विक्रेता व असंख्य ग्राहक असल्याने विक्रेता वस्तूच्या किंमतीवर पूर्णतः प्रभाव पाडू शकतो. या बाजारपेठेतील मागणी पूर्ण स्पर्धेच्या बाजाराप्रमाणे पूर्णपणे लवचिक न राहता कमी लवचिक असते. त्यामुळे सीमांत प्राप्ती सरासरी प्राप्तीपेक्षा कमी असते. म्हणून सीमांत प्राप्तीचा वक्र सरासरी प्राप्ती वक्राच्या खालच्या बाजूला असतो.

| वस्तूची किंमत (रु.) | विक्री परिमाण (नग) | एकूण प्राप्ती (रु.) | सरासरी प्राप्ती (रु.) | सीमांत प्राप्ती (रु.) |
|---|---|---|---|---|
| १० | १ | १० | १० | १० |
| ९ | २ | १८ | ९ | ८ |
| ८ | ३ | २४ | ८ | ६ |
| ७ | ४ | २८ | ७ | ४ |
| ६ | ५ | ३० | ६ | २ |
| ५ | ६ | ३० | ५ | ० |
| ४ | ७ | २८ | ४ | २ |

वरील कोष्टकावरुन हे स्पष्ट होते की, सरासरी प्राप्ती मंद गतीने तर सीमांत प्राप्ती वेगाने घटते. म्हणून सीमांत प्राप्तीचा वक्र हा सरासरी प्राप्ती वक्राच्या खाली ऋणात्मक आकाराचा आढळतो.



आकृतीमध्ये सीमांत प्राप्ती वक्र सरासरी प्राप्ती वक्राच्या खाली काढलेला आहे जो असे दर्शवितो की सीमांत प्राप्ती ही सरासरी प्राप्तीपेक्षा वेगाने घटत आहे.

## अपेक्षित प्रश्न

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१. एकूण, सरासरी व सीमांत प्राप्ती म्हणजे काय? त्यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

२. पूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत उद्योगसंस्थेचे/पेढीचे सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती वक्र कसे असतात ते आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करा.

३. एकाधिकारात सीमांत प्राप्ती वक्र व सरासरी प्राप्ती वक्र कसे असतात ते आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. सरासरी प्राप्ती म्हणजे काय?

२. सीमांत प्राप्ती म्हणजे काय?

३. एकूण प्राप्तीची व्याख्या द्या.

४. सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती ह्या संकल्पना स्पष्ट करा.

५. सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती ह्यातील संबंध स्पष्ट करा.